सं.फौ. ख.क्र. ३०२/२०१९
सरकार वि. रविना उर्फ प्रविणा.
नि.क्र. ९/ड

## अर्ज नि.क्र.९ वर आदेश

१. प्रभारी अधिकारी पोलीस ठाणे, रोहा यांनी प्रस्तुत अर्ज दारुबंदी वारस गु.नो.क्र.३१/२०१९ मधील जप्त एक प्लास्टीक कॅन व एक काळया रंगाची रबरी ट्यूब त्यात प्रत्येकी ४० लि. अशी एकूण ८० लि. गावठी हातभट्टीची दारु असलेला किंमत रूपये ३,२००/–बाबत पोलीस ठाण्यात मुद्देमाल साठवणूकीसाठी जागा अपुरी असल्यामुळे पुढील आदेश होण्यासाठी दाखल केला आहे. आरोपीतर्फे विधीज्ञानी 'योग्य ते आदेश करावेत' असे म्हणणे दाखल केले.

२. अभियोजन पक्षातर्फे विशेष सहा.सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. एस. म्हात्रे व आरोपीतर्फे श्री. ए. पी. दांडेकर यांचा युक्तिवाद ऐकला.

३. अभियोजन पक्षाने आरोपीविरुध्द दि.१६.०७.२०१९ रोजी महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) अन्वये अंतिम अहवाल दाखल केला आहे. अभियोजन पक्षाने रासायनीक परिक्षण अहवाल प्राप्त करण्यासाठी न्याय संचालक सहा.वैज्ञानिक प्रयोगशाळा, कलिना, मुंबई यांना अहवाल सादर केला आहे. तथापी रासायनिक परिक्षण अहवाल प्राप्त झाला नाही.

४. अंतिम अहवालावरुन अन्वेषण अधिकाऱ्याने आरोपीच्या ताब्यातून उपरोक्त दारुचा मुद्देमाल जप्त केला आहे असे दिसते. आरोपीची मुद्देमालाबाबत आदेश होण्यास हरकत नाही.

५. आरोपीविरुध्द खटला प्रलंबीत आहे. पोलीस ठाण्यामध्ये मुद्देमाल ठेवण्यास जागा अपुरी असल्यामुळे फौ.प्र.सं.,१९७३ चे कलम ४५१ व ४५७

फौजदारी नियमावली प्रकरण क्र.६ परि.क्र.८० सोबत महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम, १९४९ चे कलम १४३ अन्वये बहाल झालेल्या शक्तीनुसार राज्य शासनाने तयार केलेल्या नियमानुसार म्हणजेच मुंबई दारुबंदी जप्त केलेल्या किंवा हक्क काढून घेतलेल्या वस्तु (विल्हेवाट) नियमन, १९५३ नुसार जप्त मुद्देमालाबाबत आदेश पारीत करणे गरजेचे आहे. म्हणून खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**आदेश**

१. प्रभारी अधिकारी पोलीस ठाणे, रोहा यांचा अर्ज नि. क्र. ९ मंजूर करण्यात येतो.

२. प्रभारी अधिकारी पोलीस ठाणे, रोहा यांनी पोलीस ठाणे, रोहा प्रो. वा. गु. क्रमांक ३१/२०१९ मधील जप्त दारुच्या मुद्देमालाबाबत मुंबई दारुबंदी जप्त केलेल्या किंवा हक्क काढून घेतलेल्या वस्तु (विल्हेवाट) नियमन, १९५३ मधील तरतुदींचे अवलोकन व पालन करुन त्यामधील नियम क्रमांक ०२ नुसार जिल्हाधिकारी, राज्य उत्पादन शुल्क, रायगड यांच्याकडून सत्वर आदेश प्राप्त करुन घेवून जप्त मुद्देमालाची कायदेशीर विल्हेवाट लावावी.

---स्वाक्षरी---

(स. दि. कमलाकर)
प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, रोहा

दिनांकः ०७.१०.२०१९